**क्रमांक ८९**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग — दोन**

**<u>सोमवार, दिनांक २५ जुलै, २०२२ / श्रावण ३, १९४४ (शके)</u>**

८९. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांचेद्वारे कळविण्यात आले आहे की, रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रातील १९२ अलिबाग-मुरूड सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. महेंद्र हरी दळवी यांचेविरूध्द अलिबाग पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १६५ / २०१३ भा.दं.वि.सं. कलम ३२४, १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ५०४, ५०६ अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अधिनियम १९८९ चे कलम ३ (१) (१०) मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) / १३५ अन्वये दाखल झाला होता आणि त्याचा स्पेशल अॅट्रॉसिटी केस नं. १३/२०१४ असा होता. सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. महेंद्र हरी दळवी यांची मा. जिल्हा सत्र न्यायालय रायगड-अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी झाली असून सदर सुनावणी मध्ये मा. जिल्हा सत्र न्यायाधीश यांनी ३२४, १४३, १४७, १४८, ५०४, ५०६ R/W १४९ IPC ३७ (१) (३) मुंबई पोलीस अधिनियम या गुन्ह्याबद्दल सिध्दापराध ठरविले असून दिनांक १३/०५/२०२२ रोजी २ वर्ष कारावास व ५ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावली असून त्यामध्ये त्यांनी मा. जिल्हा सत्र न्यायालय रायगड-अलिबाग यांचे न्यायालयातून जामीन घेतलेला आहे.

सदर शिक्षेच्या विरोधात श्री महेंद्र हरी दळवी, यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल नं. ५४८/२०२२ दिनांक १३/०६/२०२२ अन्वये अपिल दाखल केले आहे. सन्माननीय सदस्यांना सुनावण्यात आलेली २ वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा गुणवत्तेनुसार अपीलावर निर्णय होईपर्यंत निलंबित ठेवली जाऊ शकते व त्यांची जामीनावर सुटका होऊ शकते असे अभिप्राय मा.न्यायालयाने सदस्यांच्या जामीन अर्जावर नोंदविले आहेत. सद्यस्थितीत श्री. महेंद्र हरी दळवी हे जामीनावर मुक्त आहेत.

श्री महेंद्र दळवी यांनी शिक्षेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या अपिलावर मा. उच्च न्यायालयाने अद्यापपर्यंत निकाल दिलेला नाही. सदरचे अपिल मा. उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २५ जुलै, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)